कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांचा अभ्यास करुन या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यमापन करणे व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपययोजना करण्याकरिता समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः- प्रक्रिया१११७/प्र.क्र.२१८/९-स
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०३ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक:-प्रक्रिया११००४/प्र.क्र.१६२(अ)/९-स, दि. १२.१०.२००७
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक:- प्रक्रिया१११०/प्र.क्र.१८९/९-स, दि. १२.१०.२०१०
३) मा. मंत्री सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे पत्र क्रमांक:- मंत्री/सह.पणन व वस्त्रो./ व्ही.आय.पी./सो./३२०९/२०१७, दि. ११.०८.२०१७

प्रस्तावना :-

राज्यात सुमारे २ लाख सहकारी संस्था कार्यरत असुन या संस्थांची सभासद संख्या सुमारे ५.५ कोटी आहे. राज्यातील सहकार क्षेत्रातील खेळते भांडवल रु. ६.०० लाख कोटी आहे. या सहकारी संस्थांचे राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्वाचे योगदान आहे. राज्यातील सर्व सहकारी संस्थांचे कामकाज सहकार कायदा, नियम, संस्थेची उपविधी, नाबार्डच्या मार्गदर्शक सुचना व शासनाच्या धोरणात्मक निर्णयास अधिन राहुन करणे अपेक्षित आहे. तथापी, काही संस्थांनी कायदा, नियम, उपविधीतील तरतुदी व शासनाच्या धोरणात्मक निर्णयाचे उल्लंघन करुन निर्णय घेतल्यामुळे अशा संस्था आर्थिक अडचणीत आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने कृषी पणन व प्रक्रिया सहकारी संस्थांचा अभ्यास करुन या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यामापन करणे व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपययोजना करण्याकरिता समिती गठीत करण्याबाबत मा. मंत्री (पणन) यांनी वाचा मधील क्रमांक ३ च्या पत्राद्वारे निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशास अनुसरुन कृषी पणन व प्रक्रिया सहकारी संस्थांचा अभ्यास करुन या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यामापन करणे व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपययोजना करण्याकरिता समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

शासन निर्णय:-

राज्यातील कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांना राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेअंतर्गत प्रादेशिक पिकवारी व राज्याची भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन वेगवेगळे आकृतीबंध वेगळे न ठेवता राज्यातील सर्व कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांना शासकीय भागभांडवल व वित्तीय पुरवठयाकरिता शासन हमीवर अर्थसहाय्य मंजुर करण्याचा निर्णय वाचा मधील क्रमांक १ व २ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. अर्थसहाय वितरीत केलेल्या कृषी पणन व प्रक्रिया सहकारी संस्थांचा अभ्यास करुन या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यमापन करणे

व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता खालील अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात येत आहे.

अनुक्रमांक	**नाव**	**पदनाम व कार्यालय**	**समितीमधील पदनाम**
१	डॉ. आनंद जोगदंड	पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे	अध्यक्ष
२	श्रीमती ज्योती लाटकर	विभागीय सहकनिबंधक, कोकण विभाग, नवी मुंबई	सदस्य
३	श्री. बी.एस. जाधव	सहसंचालक(प्रक्रिया),पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे	सदस्य
४.	श्री. अरुण काकडे	जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर	सदस्य सचिव

२. समितीस आवश्यक असणाऱ्या कागदपत्रे पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयामार्फत पुरविण्यात येतील. समितीने अर्थसहाय वितरीत केलेल्या कृषी पणन व प्रक्रिया सहकारी संस्थांचा अभ्यास करुन, या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यमापन करणे व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता सोबतच्या “परिशिष्ट -अ” मध्ये नमुद केलेल्या मुद्यांच्या आधारे आपला अहवाल ६० दिवसात शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०३१५०१०४१६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Valvi Kalu Gonya

Digitally signed by Valvi Kalu Gonya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op,Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, cn=Valvi Kalu Gonya
Date: 2017.11.03 15:43:29 +05'30'

(का. गो. वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री, पणन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा. राज्यमंत्री, पणन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक,
४) पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
६) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,

७) सर्व सहाय्यक उपनिबंधक, सहकारी संस्था,
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई,
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -२, नागपूर,
१०) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई,
११) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र -२, नागपूर,
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१३) श्री. डॉ. आनंद जोगदंड, पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) श्रीमती ज्योती लाटकर, विभागीय सहकनिबंधक, कोकण विभाग, नवी मुंबई
१५) श्री. बी.एस. जाधव, सहसंचालक(प्रक्रिया),पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६) श्री. अरुण काकडे, जिल्हा उपनिबंधक कोल्हापूर
१७) निवड नस्ती ९-स.

परिशिष्ट - अ

शासन निर्णय क्रमांक :- प्रक्रीया १११७/प्र.क्र.२१८/९-स, दिनांक:- ०३ नोव्हेंबर, २०१७ सोबतचे परिशिष्ट

१. संस्था स्थापन करण्याचा उद्देश, उद्देशाची पुर्तता कितपत झाली आहे.

२. संस्थांचे उद्देश साध्य करण्यात आलेल्या अडी-अडचणी व त्या सोडविण्यासाठी करावयाची उपाययोजना.

३. संस्थांना दिलेले शासकीय अर्थसहाय, त्याचा विनियोग व आतापर्यंत झालेली वसुली.

४. संस्थांनी केलेले उल्लेखनीय कामकाज.

५. सभासदांच्या आर्थिक उन्नतीत संस्थेचे योगदान.

६. संस्थामुळे झालेली रोजगार निर्मिती.

७. संस्थांच्या कामकाजात आढळुन आलेल्या त्रुटी, अनियमितता व गैरव्यवहार.

८. अनियमितता व गैरव्यवहार प्रकरणी विभागाने केलेली कारवाई.

९. अवसायनात गेलेल्या संस्थांचे पुनर्जिवन करण्यासाठी उपाययोजना.

१०. संस्थांच्या कामकाजात गुणात्मक वाढ होण्यासाठी करावयाच्या उपाय योजना.

११. सहकार चळवळीच्या व्यापक हिताच्या दृष्टीने शासन स्तरावर करावयाचे धोरणात्मक निर्णय.